असा. क्र. १५९

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जुलै १, २००५/आषाढ १०, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जुलै २००५.

अधिसूचना

मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९.

क्रमांक बीपीए. २००२/१/इएक्ससी-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई पंचवीस) (यात पुढे ज्याचा " उक्त अधिनियम " असा निर्देश केलेला आहे) च्या कलम १४३ च्या उप कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे हे नियम आधी प्रसिद्ध न करता ते करण्यात यावेत ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप कलम (२) च्या खंड (ब) व (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन खालील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना " मुंबई विदेशी मद्य (तृतीय सुधारणा) नियम, २००५ " असे संबोधिण्यात यावे.

[किंमत : रुपये ३.००]

२. महाराष्ट्र विदेशी मद्य नियम, १९५३ मधील नियम, ७० डी मधील,—

(i) उप नियम (१) शब्द व अंक " वय वर्ष २५ " याऐवजी " वय वर्ष २१ " असे वाचावे.

(ii) उप नियम (२) मध्ये शब्द व अंक " वय वर्ष २५ " याऐवजी " वय वर्ष २१ " असे वाचावे.

(iii) उप नियम (३) मध्ये,—

(अ) शब्द व अंक " वय वर्ष २५ " याऐवजी " वय वर्ष २१ " असे वाचावे आणि

(ब) शब्द आणि अंक " फी रु. २५ आणि ६५ पैसे कोर्ट फी करिता " ऐवजी " फी रु. १०० एक वर्षासाठी किंवा रु. १००० कायमस्वरूपी " परवानासाठी असे वाचावे.

(iv) उप नियम (४) मध्ये,—

(अ) " जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी " या शब्दाऐवजी " एक वर्षाचा कालावधी किंवा कायमस्वरूपी परवाना " असे वाचावे ; आणि

(ब) शब्द आणि अंक " फी रु. २५ प्रतिवर्ष " ऐवजी " फी रु. १०० एक वर्षाच्या परवानासाठी किंवा रु. १००० कायमस्वरूपी परवानासाठी " असे वाचावे.

(v) उप नियम (५) मध्ये शब्द आणि अंक " फी रु. २५ प्रतिवर्ष प्रमाणे जास्तीत जास्त तीन वर्षांसाठी नवीन परवाना त्याला मंजूर करावा " ऐवजी " फी रु. १०० एक वर्षासाठी किंवा प्रकरणपरत्वे फी रु. १००० कायमस्वरूपी परवान्यासाठी " असे शब्द व अंक वाचावे.

३. उक्त प्रधान नियमाच्या नियम ७० एफ मधील,—

(i) उप नियम (१) मध्ये,—

(अ) " एकवीस वर्षे " या शब्दाऐवजी " अठरा वर्षे " असे वाचावे. आणि

(ब) " सौम्य मद्य " या शब्दाऐवजी " सौम्य बीअर किंवा सौम्य मद्य " असे वाचावे.

(ii) उप नियम (२) मध्ये शब्द आणि अंक " फी रु. २५ आणि ६५ पैसे कोर्ट फी स्टॅम्प-करिता " ऐवजी " फी रु. १०० एक वर्षाच्या परवानासाठी व रु. १००० कायमस्वरूपी " असे वाचावे.

(iii) उप नियम (३) मध्ये शब्द आणि अंक " वय २५ वर्षे " ऐवजी " वय २१ वर्षे " असे वाचावे.

(iv) उप नियम (५) मध्ये शब्द आणि अंक " फी रु. २५ प्रतिवर्ष " ऐवजी " फी रु. १०० प्रतिवर्षी " असे वाचावे.

४. उक्त नियम ७० (एफ) नंतर खालील नियम समाविष्ट करावे :—

७० (जी). विदेशी मद्य आणि देशी मद्य खरेदी, बाळगणे, वाहतूक, वापर आणि सेवनासाठीचा एक दिवसाचा परवाना :—

(१) सदर अधिनियमात किंवा नियमाच्या नियम ७० डी मधील उप नियम ३, ४ किंवा ५ मध्ये काहीही नमूद केले असले तरी कायद्यान्वये जिल्हाधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा या नियमाखाली दिलेल्या फॉर्म एफएल-२, एफएल-३, एफएल-४ अनुज्ञप्त्या आणि महाराष्ट्र देशी दारू नियम, १९७३ खाली दिलेल्या फॉर्म सीएल-३ अनुज्ञप्तीच्या प्रभारी व्यक्ती ज्यांना निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी प्राधिकृत केलेले आहे अशा व्यक्ती एफएल-एफ किंवा सीएल-सी या नमुन्यातील एक दिवसाचा परवाना मंजूर करू शकतील. असा परवाना ज्यांचे वय २१ वर्षांपेक्षा कमी नाही व विदेशी अथवा देशी मद्य स्वतःच्या सेवनासाठी खरेदी करू इच्छितात अशा व्यक्तींना या नियमाखाली फॉर्म एफएल-एफ हा परवाना विदेशी मद्यासाठी फी रु. ५ आणि फॉर्म सीएल-सी हा परवाना देशी मद्यासाठी फी रू. २ वसूल करून मंजूर करू शकतील. परंतु, वर्धा जिल्ह्यासाठी अशाप्रकारे एक दिवसासाठी मद्य सेवन परवाना मंजूर करता येणार नाही.

(२) या परवान्याची मुदत हा परवाना दिल्याच्या दिवसापासून ते दुसऱ्या दिवशी सूर्योदयापर्यंत राहील.

(३) नमुना एफएल-एफ किंवा नमुना सीएल-सी या परवान्यावर विदेशी मद्य किंवा देशी मद्य जास्तीत जास्त एक युनिटपेक्षा जास्त मद्य खरेदी व बाळगता येणार नाही.

नमुना एफएल-एफ

क्र. ....

नमुना एफएल-एफ

(नियम ७० जी पहा)

(फक्त कार्यालयासाठी)

एक दिवसीय परवाना.

(१) परवाना जारी केल्याचा दिनांक ....

(२) शुल्क रुपये ५ (रुपये पाच)

(३) जारी करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाची स्वाक्षरी व शिक्का ....

सदर परवाना जारी केल्याच्या दिनांकापासून दुसरे दिवशी सुर्योदयापर्यंत ग्राह्य राहील. या परवान्यावर ७५० मि.ली. मद्याचे एक युनिट बाळगण्याची मर्यादा राहील.

महाराष्ट्र शासन

एक दिवसीय परवाना

महाराष्ट्र राज्यात विदेशी दारु विकत घेणे, बाळगणे, वाहतूक करणे, वैयक्तिक सेवन व वापरासाठी.

नमुना एफएल-एफ

(नियम ७० जी पहा)

क्रमांक ....

(१) परवाना जारी केल्याचा दिनांक ....

(२) शुल्क रुपये ५ (रुपये पाच)

(३) जारी करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाची स्वाक्षरी व शिक्का ....

सदर परवाना जारी केल्याच्या दिनांकापासून दुसरे दिवशी सुर्योदयापर्यंत ग्राह्य राहील. या परवान्यावर ७५० मि.ली. मद्याचे एक युनिट बाळगण्याची मर्यादा राहील.

नमुना सीएल-सी

क्र. .... नमुना सीएल-सी (नियम ७० जी पहा) (फक्त कार्यालयासाठी) एक दिवसीय परवाना. (१) परवाना जारी केल्याचा दिनांक .... (२) शुल्क रुपये २ (रुपये दोन) (३) जारी करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाची स्वाक्षरी व शिक्का	**महाराष्ट्र शासन** एक दिवसीय परवाना महाराष्ट्र राज्यात देशी दारु विकत घेणे, बाळगणे, वाहतूक करणे, वैयक्तिक सेवन व वापरासाठी. नमुना सीएल-सी (नियम ७० जी पहा) क्रमांक .... (१) परवाना जारी केल्याचा दिनांक .... (२) शुल्क रुपये २ (रुपये दोन) (३) जारी करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाची स्वाक्षरी व शिक्का ....
सदर परवाना जारी केल्याच्या दिनांकापासून दुसरे दिवशी सुर्योदयापर्यंत ग्राह्य राहिल. या परवान्यावर ७५० मि.ली. मद्याचे एक युनिट बाळगण्याची मर्यादा राहिल.	सदर परवाना जारी केल्याच्या दिनांकापासून दुसरे दिवशी सुर्योदयापर्यंत ग्राह्य राहिल. या परवान्यावर ७५० मि.ली. मद्याचे एक युनिट बाळगण्याची मर्यादा राहिल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गौ. जो. रसाळ,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st July 2005

NOTIFICATION

BOMBAY PROHIBITION ACT, 1949.

No. BPA. 2002/CR. 1/EXC-II.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Bombay Prohibition Act, 1949 (Bom. XXV of 1949) ;

Now therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*), (*k*) and (*u*) of sub-section (*2*) of section 143 of the Bombay Prohibition Act, 1949 (Bom. XXV of 1949) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Third Amendment) Rules, 2005.

2. In rule 70D of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 (hereinafter referred to as " the principal rules "),—

(*i*) in sub-rule (1), for the words and figures " the age of 25 years " the words and figures " the age of 21 years " shall be substituted ;

(*ii*) in sub-rule (2), for the words and figures " the age of 25 years " the words and figures " the age of 21 years " shall be substituted ;

(*iii*) in sub-rule (3),—

(*a*) for the words and figures " the age of 25 years " the words and figures " the age of 21 years " shall be substituted ; and

(*b*) for the words and figures " a fee of Rs. 25 and sixty-five paise towards the court fee stamp " the words and figures " a fee of Rs. 100 for one year or Rs. 1000 for a permanent permit ", shall be substituted ;

(*iv*) in sub-rule (4),—

(*a*) for the words " for a period of maximum of three years " the words " for a period of one year or a permanent permit " shall be substituted ; and

(*b*) for the words and figures " a fee of Rs. 25 per year is paid for the said period " the words and figures " a fee of Rs. 100 for one year permit or the fee of Rs. 1000 for a permanent permit is paid ", shall be substituted ;

(*v*) in sub-rule (5), for the words and figures " rate of Rs. 25 per year grant him a fresh permit for maximum period of three years " the words and figures " rate of Rs. 100 for one year permit or, as the case may be Rs. 1000 for a permanent permit, grant him a fresh permit ", shall be substituted.

3. In rule 70F of the principal rule,—

(*i*) in sub-rule (1),—

(*a*) for the words " twenty-one years " the words " eighteen years " shall be substituted ; and

(*b*) for the words " mild liquor " the words " mild beer or mild liquor "shall be substituted ;

(*ii*) in sub-rule (2), for the words and figures " a fee of Rs. 25 and sixty-five paise towards the court fee stamp " the words and figures " a fee of Rs. 100 for one year permit and Rs. 1000 for permanent permit " shall be substituted ;

(*iii*) in sub-rule (3), for the words and figures " age 25 years " the words " age of twenty-one years " shall be substituted ;

(*iv*) in sub-rule (5), for the words and figures " a fee of Rs. 25 " the words and figures " a fee of Rs. 100 " shall be substituted ;

4. After rule 70F, the following rule shall be added, namely :—

" 70G. One day permit for the purchase, possession, transport, use and consumption of foreign liquor and country liquor :—

(1) Notwithstanding anything contained in sub-rule (3), (4) or (5) of rule 70D of these rules, it shall be lawful for the Collector or the officer authorised by the State Government or the person incharge of licence in Form F.L. II, F.L. III and F.L. IV issued under these rules and Form C.L. III issued under the Maharashtra Country Liquor Rules, 1973, duly authorised in this behalf by the Inspector of State Excise, to grant one day permit in Form F.L.F or C.L.C, as the case may be , to any person not below the age of twenty-one years desiring to purchase foreign liquor or country liquor, as the case may be, for his consumption on payment of a fee of Rs. 5 for foreign liquor and on payment of a fee of Rs. 2 for country liquor :

Provided that, no such one day permit shall be granted to any person in Wardha District.

(2) The one day permit granted under this rule shall be valid till the sunrise of the day following the day of issue of the permit.

(3) The one day permit shall be granted for a quantity not exceeding one unit.

FORM FL-F

No. ....
Form FL-F
One Day Permit
(See Rule 70-G)
(For Office use only)
(1) Date of issue of permit ....
(2) Fee Rs. 5 (Rupees Five)
(3) Signature and Seal of Licence holder issuing permit ....

Maharashtra State
One Day Permit
For the purchase, possession, transport, use and consumption of Foreign Liquor in the State of Maharashtra.
Form FL-F
(See Rule 70-G)
No. ....
(1) Date of issue of permit ....
(2) Fee Rs. 5 (Rupees Five)
(3) Signature and Seal of Licence holder issuing permit ....

This permit is valid from date of issue till sunrise of next day. The possession limit of 750 ml. liquor is valid on this permit.

This permit is valid from date of issue till sunrise of next day. The possession limit of 750 ml. liquor is valid on this permit.

FORM CL-C

No. ....
Form CL-C
One Day Permit
(See Rule 70-G)
(For Office use only)
(1) Date of issue of permit ....
(2) Fee Rs. 2 (Rupees Two)
(3) Signature and Seal of Licence holder issuing permit ....

Maharashtra State
One Day Permit
For the purchase, possession, transport, use and consumption of Country Liquor in the State of Maharashtra.
Form CL-C
(See Rule 70-G)
No. ....
(1) Date of issue of permit ....
(2) Fee Rs. 2 (Rupees Two)
(3) Signature and Seal of Licence holder issuing permit ....

This permit is valid from date of issue till sunrise of next day. The possession limit of 750 ml. liquor is valid on this permit.

This permit is valid from date of issue till sunrise of next date. The possession limit of 750 ml. liquor is valid on this permit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. J. RASAL,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई